# मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणक्रमनिहाय अभ्यासकेंद्र सूचीचे

# मा. कुलगुरूंच्या हस्ते प्रकाशन

नाशिक :- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाद्वारे देण्यात येणाऱ्या दुरशिक्षणाचा लाभ ४ लाखाहून अधिक विद्यार्थी घेत आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थ्यांसाठी तब्बल ४००० अभ्यासकेंद्रे कार्यरत आहेत. महाराष्ट्रभर विखुरलेल्या या अभ्यासकेंद्राची शिक्षणक्रमनिहाय तसेच केंद्र संयोजकांची माहिती मिळणे सुलभ व्हावे या उद्देशाने मुक्त विद्यापीठाच्या सर्व शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्र प्रमुख आणि केंद्र संयोजक यांचा तपशील असलेल्या सूचीचे प्रकाशन कुलगुरू डॉ. आर कृष्णकुमार यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या सर्व संबंधितांना, विद्यापीठाच्या विभागीय व जिल्हा केंद्राच्या सहकाऱ्यांना या सूचीचा लाभ होईल असा विश्वास यावेळी कुलगुरू डॉ. आर. कृष्णकुमार यांनी व्यक्त केला. विद्यापीठाच्या परिवारामध्ये नवनवीन संस्थांचा समावेश होत आहे. त्यामुळे दरवर्षी अद्ययावत अशी सूची प्रकाशित करण्याचाही मानसही यावेळी व्यक्त केला गेला.

विद्यापीठाच्या विद्यार्थी सेवा विभागातील प्रा. प्रवीण घोडेस्वार यांनी ही सूची संकलित केली असून या कामी त्यांना प्रा. विजयकुमार पाईकराव, प्रा. राजेंद्र वाघ, प्रा. सुरेंद्र पाटोळे, प्रा. शुभांगी देसले, श्रीमती रामेश्वरी मुळे, श्री. गिरीश वाघ, डॉ. आशिष सूर्यवंशी, आणि प्रा. हेमंत राजगुरू यांनी मोलाचे सहकार्य केले.

सूची सिद्ध होण्यासाठी अभ्यासकेंद्र व्यवस्थापन कक्षातील श्री. मधुकर खांडेकर, श्री. संभाजी मोरे, श्री. निरंजन गोसावी यांनी विशेष परिश्रम घेतले असून सूचीच्या निर्मितीची बाजू ग्रंथनिर्मिती केंद्राचे व्यवस्थापक श्री. आनंद यादव आणि श्री. प्रमोद कुलकर्णी यांनी सांभाळली. मुखपृष्ठकार श्री. अविनाश भरणे यांनी या सूचीचे आकर्षक मुखपृष्ठ तयार केले.

सूची प्रकाशनाच्या या प्रसंगी कुलसचिव डॉ. प्रकाश अतकरे, विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. एन. आर. शिंदे, विद्याशाखा समन्वयक आदी उपस्थित होते.

